नि. दि. दा. क्र. ३४८/२०२३
अशोक चिलमे वि. हरीश्चंद्र चिलमे व इतर
नि.क्र. ११०

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा उलटतपास वादीतर्फे वकील श्री. ए.एम.निंबुर्गे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–**

४. वादी व प्रतिवादी क्र. १ हे माझे चुलत चुलते आहेत. मी शेती करतो. माझ्या मुलाला मी किराणा दुकान टाकून दिले आहे. माझे शिक्षण इयत्ता ६ वी पर्यंत झाले आहे. माझा मुलगा माझ्या सोबत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाच्या दुकानात गुटखा सापडला म्हणुन त्याला पोलीसांनी पकडले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ चा मुलगा जो पोलीस खात्यामध्ये आहे त्याने मला मदत केली. लखनगाव चे लांडगे मला माहिती आहेत. त्यांनी बुधडा येथे मारवाडी यांची जमीन घेतली आहे. म्हणुन त्यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, लखनगावचे लांडगे यांच्या नातेवाईकांनी आत्महत्या केली व त्यांनी त्यांच्या चिठ्ठी मध्ये माझे नाव लिहीले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व्याजाच्या पैश्यासाठी त्यास त्रास देत होतो असे त्या चिठ्ठीमध्ये लिहीलेले होते. सदरची घटना सन २०१४ मध्ये घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी प्रतिवादी क्र. १ व त्यांचा मुलगा यांनी माझ्यावर केस होऊ दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३४/अ/२ मधील जमीन माझ्या पत्नीच्या नावे आहे.

५. गंगाराम चिलमे यांनी माझ्या समक्ष वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यामध्ये तोंडी वाटणी करून दिली व त्यात रस्त्याच्या कडेचा भाग प्रतिवादी क्र. १ च्या हिस्स्याला दिला व मागचा भाग वादीच्या हिस्स्यात दिला. माझ्या समक्ष तोंडी वाटणी झाली याबाबत मी वकीलसाहेबांना सांगितले नाही. गंगाराम चिलमे यांनी कोणत्या साली तोंडी वाटणी केली हे मला सांगता येत नाही. माझ्या वडीलांनी १००/– च्या बॉन्डवर माझी पत्नी व दोन मुले यांच्या नावावर वाटणीपत्र करून दिलं. मयत गंगाराम यांनी तोंडी वाटणी वादी व प्रतिवादी क्र. १ यांना करून दिली त्याबाबतचा अमल झाला किंवा नाही याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या नावाने गट क्र. ३४/ब मधील जमिनीचे खरेदीखत करून दिले

किंवा नाही याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. १ ने दक्षिण बाजूने पुर्व–पश्चिम १२ फुट रूदींचा रस्ता दिला आहे याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही. सदर रस्ता १२ फुटाचा आहे किंवा १४ फुटाचा आहे हे मी मोजून बघितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाऊस पडल्यानंतर संपूर्ण जमिनीमध्ये चिखल होतो. मला तेवढं नीट वाचता येत नाही. माझे सरतपासाचे शपथपत्र तयार केल्यानंतर मला त्यातील मजकूर वाचून दाखविण्यात आला.

६. वकीलसाहेबाने माझे सरतपासाचे शपथपत्र तयार करून आणले व त्यावर माझ्या सह्या घेतल्या. मी उमाकांत राठोड यांच्यासोबत वकीलसाहेबांकडे गेलो नव्हतो. मला माझे सरतपासाचे शपथपत्र द्यायचे हे मला प्रतिवादी क्र. १ ने सांगितले. प्रतिवादी क्र. १ ने वाद काय चालू आहे हे मला सांगितले नाही. मी गट क्र. ३४/ब च्या ७/१२ च्या उता–यामध्ये कोणाचे नाव आहे व कोणाची वहिती होती हे बघितले होते. मी १२ महिने ७/१२ चा उतारा बघितला होता. गट क्र. ३४/अ/२ मधील जमीन माझ्या वडीलांनी माझ्या पत्नीच्या नावाने ८ ते १० वर्षापुर्वी केली आहे. त्यापुर्वी माझे वडील व मी वहिती करीत होतो. गट क्र. ३४/अ/२ च्या ७/१२ च्या उता–यावर पुर्वी माझ्या वडीलांचे नाव वहितीला होते. वादी व प्रतिवादी क्र. १ १९९०–१९९१ सालापासून स्वतंत्रपणे वहिती करीत आहेत हे मी ते स्वतंत्र शेती करतात म्हणुन सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९०–१९९१ पासून त्यांची नावे गट क्र. ३४/ब च्या ७/१२ च्या उता–याला आहेत. मला नि.क्र. ९२ व ९५ वरील ७/१२ चा उतारा दाखविला असता त्यामध्ये १९९३ ते २००० पर्यंत वहितीच्या रकान्यात प्रतिवादी क्र. १ चे नाव आहे. माझे चुलते पोलीस खात्यातून ७–८ वर्षापुर्वी सेवानिवृत्त झाले. ते एसआरपीएफ मध्ये किती काळ होते याची माहिती मला नाही. ते लातूर येथे कधी आले याची माहिती मला नाही. गंगाराम यांनी गट क्र. ३४/ब मध्ये विहीर होती असे लिहुन ठेवले होते किंवा नाही याची माहिती मला नाही.

७. उमाकांत राठोड यांच्या शेतजमिनीमध्ये हरभरा व ज्वारीचे पीक आहे. उमाकांत राठोड व इतर दोन भावांच्या नावाने शेतजमीन आहे असे म्हणतात. मी त्यांच्या शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा बघितला नाही. प्रतिवादी क्र. १ हे नौकरी करत असतात

म्हणुन मी गट क्र. ३४/ब चा ७/१२ चा उतारा विम्यासाठी काढून घेत होतो. गट क्र. ३४/ब चा विमा मी भरत नव्हतो. त्यांचा विमा ते भरायचे. माझे वडील ७ ते ८ वर्षापुर्वी वारले. मला माझे वडील कधी वारले ते वर्ष सांगता येत नाही. सन २०१५ साली प्रतिवादी क्र. १ यांनी गट क्र. ३४/ब मध्ये विहीर पाडली हे लक्षात राहण्याचे कारण मी त्यांच्या विहीरीचे पाणी घेत होतो. मी त्यांच्या पाण्यावर ३ वर्षे ऊस लावला होता. ऊसाची नोंद मी ७/१२ च्या उता–यावर घेतलेली नव्हती. कारखान्याला ऊस घालायचा असेल तर कारखान्याला ७/१२ चा उतारा द्यावा लागतो. कारखान्याने ७/१२ च्या उता–यावर ऊसाची नोंद माझ्याकडे मागितलेली नाही. प्रतिवादी क्र. १ ने दोन बोअर कधी घेतले त्याचे वर्ष मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र. १ ने त्यांच्या शेतामध्ये पाईपलाईन केली होती. प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या जमिनीमध्ये ऊस लावला आहे त्याची नोंद ७/१२ च्या उता–याला आहे किंवा नाही याची माहिती मला नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ व त्यांच्या मुलाने माझ्यावर फौजदारी केसेस होऊ नये म्हणुन मदत केली असल्याने त्यांना मदत करण्याकरिता मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ च्या विरोधात जाता येत नाही म्हणून त्यांच्या दावाबाखाली मी माझे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.03.04 12:17:19 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–०२.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, औसा